सायंदैनिक **साईसंध्या** • RNIN 2010/32777

• प्रमुख मार्गदर्शक • शौकत भाई शेख मो.नं.९८६११७४१११
• सह-संपादक • डॉ.आशिष तिवारी
• सह-संपादक • प्रफुल नांन्रे
• कार्यकारी संपादक • दिलीप वणवे
• मानक संपादक • अभिषेक खराडे पाटील
• संपादक • उध्दव फंगाळ मो.नं.९५११४४६१११

मेहकर • वर्ष - पहिले • अंक २८३ • पाने - 04 • किंमत - 03 रुपये (डिक्ले, टजि. नं. 30/2024) दिनांक - २२ डिसेंबर २०२४ सायंदैनिक (बुलडाणा आवृत्ती) • http://www.saisandhya.com

# नगराध्यक्ष पदासाठी रवी राहाटे यांची यशस्वी वाटचाल सुरू !!

## शिवसेनेने विश्वास टाकल्यास सार्थ ठरविन - रवी राहाटे

### शिवसेनेशी एकनिष्ठता कायम, शिवसेना संघटन मजबुतीसाठी अहोरात्र प्रयत्न

### गोरगरिबांच्या सुखदु:खात नेहमी सहभागी मित्रांचा व युवकांचा मोठा गोतावळा




मेहकर मेहकर नगरपालिकेच्या निवडणुका लवकरच होण्याचा अंदाज आहे त्या दृष्टीने सर्वच पक्षाकडून हळूहळू नगरपालिकेच्या निवडणुकीच्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे याच पार्श्वभूमीवर आदरणीय केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव सन्माननीय माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या आदेशाचे नेहमी पालन करून शिवसेना व युवा सेनेसाठी अहोरात्र प्रयत्न करणारे रवी राहाटे हे मेहकर नगरपालिका अध्यक्षपदासाठी शिवसेना शिंदे पक्षाकडून इच्छुक असून त्या प्रकारची वाटचाल त्यांनी सुरू केल्याचे दिसून येत आहे रवी रहाटे हे शिवसेना शिंदे पक्षाशी एकनिष्ठ असून पक्ष संघटन वाढविण्यासाठी रवी रहाटे यांची नेहमी धडपड असते गोरगरिबांच्या सुखदु:खात नेहमी सहभागी होऊन रवी रहाटे यांच्या पाठीमागे मित्रांचा व युवकांचा मोठा गोतावळा आहे येणाऱ्या नगरपालिकेच्या निवडणुकीत काही ठिकाणी नवीन चेहऱ्यांना संधी देण्याची गरज असल्याचे अनेकांनी बोलून दाखवले आहे जुने सुद्धा चांगलेच लोक आहेत मात्र प्रत्येकाला संधी मिळणे हेही तेवढेच खरे आहे त्या दृष्टीने रवी रहाटे यांनी नगराध्यक्ष पदासाठी आपली मानसिकता तयार केली असून शिवसेनेने जर विश्वास टाकला तर तो विश्वास मी सार्थ ठरविन असे रवी राहाटे यांनी सांगितले रवी राहाटे यांच्या धर्मपत्नी दीपिका ताई राहाटे ह्या नगरसेविका आहेत नगरसेविकेच्या माध्यमातून वॉर्डात व परिसरात विकासात्मक कामे सुरू आहेत केवळ विकासच नव्हे तर लोकांच्या सुखदु:खात हे पती-पत्नी नेहमी सहभागी होत असल्याचे दिसून आले आहे तर रवी राहाटे यांच्याकडे युवा पिढीचा मोठा गोतावळा असून त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे शिंदे शिवसेना पक्षातही रवी रहाटे यांचा चांगला मान सन्मान असून पक्ष संघटन वाढविण्यासाठी रवी रहाटे नेहमीच धडपड करत असतात कोणत्याही निवडणुकीत रवी राहाटे जीवाचे रान करून आपल्या पक्षाचा उमेदवार विजयी झाला पाहिजेत यासाठी प्रयत्न करीत असतात मात्र निवडणुका नसल्या तरी सुद्धा रवी राहाटे यांचा जनतेशी संपर्क हा कायमच असतो आपल्याकडे आलेल्या व्यक्तीचे काळजीपूर्वक समाधान झाले पाहिजे त्या व्यक्तीचे काम झाले पाहिजेत आपल्या नेत्याचे व पक्षाचे नाव कुठेही कमी व्हायला नको यासाठी रवी राहाटे नेहमी काळजी घेत असतात अलीकडच्या काळात रवी राहाटे यांच्याकडे गोरगरिबांचा युवकांचा कल वाढताना दिसत आहे मेहकर शहरातही रवी रहाटे यांची चांगली ओळख असून सर्व जाती धर्मा



तले लोक रवी राहाटे यांना ओळखतात त्यामुळे येणाऱ्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये आदरणीय केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व सन्माननीय माजी आमदार संजय रायमुलकर यांनी रवी रहाटे यांचा नगराध्यक्ष पदासाठी सहानुभूतीपूर्वक विचार केल्यास वावगे ठरणार नाही सध्याची परिस्थि

ती नवी

न चेहऱ्यांना संधी देण्याची असल्याचे दिसून येत आहे अनेक ठिकाणी लोकसभा व विधानसभेत नवीन चेहरे विजयी झाले आहेत जनता जनार्दन सध्या नवीन चेहऱ्याकडे वळत आहे त्यामुळे येणाऱ्या नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे पक्षाकडून रवी रहाटे यांचा विचार व्हावा अशी चर्चा मेहकर शहरात दबक्या आवाजात सुरू आहे मात्र राजकारणातील मुरब्बी व महामेरू समजले जाणारे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव वेळेवर कोणाला धक्का देतील व कोणाच्या गळ्यात विजयाची माळ घालतील हे कोणीही सांगू शकत नाही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे राजकारण संपूर्ण जिल्ह्यासह महाराष्ट्राने सुद्धा पाहिलेले आहे व ते राजकारणात मायबाप जनतेच्या आशीर्वादाने यशस्वी सुद्धा झाले आहेत शिंदे शिवसेना पक्षाचा मोठा विश्वास केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यावर आहे बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास सर्वच नगरपालिकेवर शिवसेनेचा शिंदे पक्षाचा झेंडा फडकण्यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे नक्कीच प्रयत्न करणार असून एक नवीन चेहऱ्यांना संधी देण्याची गरज निर्माण झाली आहे त्या दृष्टीने मेहकर शहरात सध्याच्या परिस्थितीत रवी रहाटे एक चांगला चेहरा नगरपालिकेच्या निवडणुकीच्या दृष्टीने समोर येत असल्याची चर्चा जोर धरत आहे तूर्त एवढेच

सायंदैनिक साईसंध्या संमिश्र

# महाराष्ट्राचा उत्कृष्ट कवी/कवयित्री स्पर्धा क्र. १२ चा निकाल घोषित

## महाराष्ट्राचे उत्कृष्ट कवी ठरले कवी..मा.ओंकार दशरथ राठोड,दारव्हा,जिल्हा यवतमाळ, तर महाराष्ट्राची उत्कृष्ट कवयित्री'' ठरल्या आहेत, *मा. विद्या प्रधान, जिल्हा ठाणे.




सोलापूर, सम्यक दर्शन साहित्य राज्यस्तरीय समूहात प्रत्येक आठवड्यात एक स्पर्धा घेतली जाते. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या महत्वपूर्ण विषयांवर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.. यावेळी ''महापुरूषांच्या विचारांचा जागर'' या विषयावर काव्यलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील कवी आणि कवयित्री मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. ''सम्यक दर्शन साहित्य राज्यस्तरीय मंच'' यांचे तर्फे आठवडी काव्यलेखन स्पर्धा क्र. १२ ही दि. १६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या दरम्यान घेण्यात आली होती. या काव्यलेखन स्पर्धेत यावेळी, ''महाराष्ट्राचा उत्कृष्ट कवी'' ओंकार दशरथ राठोड हे विजयी ठरले आहेत.. लालखेड पंचायत समिती दारव्हा जिल्हा यवतमाळ येथे केंद्रप्रमुख या पदावर कवी कार्यरत आहेत. त्यांचे शिक्षण बी.ए. एम. ए. मराठी, समाजशास्त्र, बीएड, एम एड. झाले आहे. त्यांचे डोंगरमाथा,व्यसनमुक्त पहाट, हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. ३ बाल हर्ष बाल काव्यसंग्रह, हिंदोलो हा बंजारा भाषेतील कविता संग्रह प्रसिद्ध आहे. विविध साहित्य समूहात त्यांचे काव्यलेखन सुरू असून अनेक स्पर्धेत ते विविध श्रेणीत पुरस्कृत झाले आहेत. आदर्श शिक्षक पुरस्कार, उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, बंजारा भुषण पुरस्कार, दारव्हा भुषण पुरस्कार, अण्णाभाऊ



साठे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित झाले आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राची उत्कृष्ट कवयित्री चा सन्मान कवयित्री मा. विद्या प्रधान, ठाणे यांना प्राप्त झाला आहे. त्यांचे शिक्षण बी. ए., संगीत



विशारद.. लघु नाटिका, भारूड, गायनाचे अनेक ठिकाणी कार्यक्रम सादर झाले आहेत. त्यांना कविता, कथा सादरीकरणाचे अनेक बक्षीस मिळाले असून पाककला, गायन यातही अनेक बक्षीसे त्यांना मिळाले आहेत. मराठी मालिका, सिनेमा व एकपात्री, द्विपात्री, नाटक या मध्ये सुद्धा त्यांना अनेक बक्षीसे मिळाली आहेत. दोन्ही कवींचे समूहाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले व भविष्यकालीन वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. सम्यक दर्शन साहित्य समूहाचे संस्थापक देविदास गायकवाड तसेच सौ.सुनिता तागवान हे आहेत तसेच सुजाता उके ह्या प्रशासिका आहेत. या समूहात प्रत्येक आठवड्यात एक स्पर्धा घेतली जाते. प्रत्येक आठवड्यात एक कवी व एक कवयित्री यांना हा सन्मान दिला जातो. तेव्हा पुढील स्पर्धांमध्ये साहित्यिकांनी सातत्याने सहभागी होत रहावे असे आवाहन समूहाच्या वतीने करण्यात आले आहे

# जिल्ह्यातील ४०४ महसूल गावांमध्ये 'पेसा दिन' साजरा होणार




शहापूर केंद्र शासनाने दि. २४ डिसेंबर, १९९६ रोजी पंचायती संबंधीचे उपबंध(अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ अर्थात पेसा कायदा पारित केला आहे. पेसा कायद्याच्या निर्मितीला दि. २४ डिसेंबर, २०२४ रोजी २८ वर्षे पूर्ण होत आहे, त्यानिमित्ताने पंचायती राज मंत्रालयाच्या निर्देशाने हा दिवस ''पेसा दिन'' म्हणून मुरबाड, भिवंडी, शहापूर तालुक्यातील महसूल गावांमध्ये साजरा करण्यात येणार आहे. पंचायती राज मंत्रालयाचे अनुसूचित क्षेत्रांमध्ये पेसा कायद्याच्या अंमलबजावणीला बळकटी देण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहे. पेसा दिनाच्या निमित्ताने ग्रामसभा सदस्य, पंचायत सदस्य तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची क्षमताबांधणी व्हावी व त्यांच्यामध्ये जनजागृती वाढावी तसेच त्यांचा या कायद्याच्या अंमलबजावणीतील सहभाग वाढवून, ग्रामसभांचे सक्षमीकरण आणि अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या कामकाजात सुधारणा ही विशेष उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पेसा दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने गाव/ग्रामपंचायत पातळीवर मेळावा, प्रशिक्षण, कार्यशाळा आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत अंतर्गत सर्व पेसा गावातील संबंधीत घटकांनी सहभाग नोंदवावा तसेच ग्रामसभा सदस्यांनी जास्तीतजास्त उपस्थिती रहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. ठाणे जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील, मुरबाड पंचायत समिती क्षेत्रातील ५५ ग्रामपंचायतींमधील १०१ महसूल गाव, भिवंडी पंचायत समिती क्षेत्रातील ४० ग्रामपंचायतींमधील ७३ महसूल गाव तर शहापूर पंचायत समिती क्षेत्रातील ११० ग्रामंपचायतींमधील २३० महसूल गाव असे एकूण ग्रामपंचायत २०५ तर महसूल गाव ४०४ येथे पेसा दिन प्रभावीपणे साजरा करण्यासाठी ग्रामपंचायत विभागाच्यावतीने नियोजन करण्यात येत आहे. पेसा कायद्याचे उत्तम ज्ञान असलेल्या व शक्यतो स्थानिक बोली भाषेचे जाणकार व्यक्ती, संस्था, अधिकारी यांनी उपस्थित सर्वांना पेसा कायद्याविषयी माहिती देणार आहेत, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) प्रमोद काळे यांनी दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पंचायत समिती भिवंडी,शहापूर व मुरबाड येथील गट विकास अधिकारी, अधिनस्त विस्तार अधिकारी (पं), तालुका व्यवस्थापक(पेसा), तालुका प्रशिक्षण समन्वयक (पेसा), ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामसभा मोबिलायझर व ग्रामस्तरीय कर्मचारी इ. सर्व यंत्रणेला पेसा दिन अंमलबजावणी उत्कृष्टपणे नियोजित करण्याबाबत निर्देशित केले आहे. पेसा कायद्याशी संबधित घोष वाक्य व बॅनर यांचा वापर करून पेसा कायद्याची जनजागृती करण्यात येणार असून अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामस्थांनी पेसा दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

सायंदैनिक **साईसंध्या** महाराष्ट्र देश

# बंदी असूनही बिजोरा येथे प्रतिबंधित खर्राची विक्री जोमात






**बिजोरा येथिल प्रतिबंधित खर्रा विक्रीला पाठबळ कुणाचे !मुडाणा बिटमधिल वाढलेले अवैद्य धंदे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता कर्तव्यदक्ष ठाणेदार धनराज निळे यांनी बिट जमादार संदिप ठाकुर यांची उचलबांगडी केल्यानंतर मुडाणा बिटचे सुत्रे नविन बिट जमादारास दिले आहेत. जिल्हा पोलिस अधिक्षक कुमार चिंता यांना एका सामाजिक कार्यकर्ताने मुडाणा बिटमधिल बिजोरा येथे प्रतिबंधित खर्राची सर्रासपणे विक्री होत असल्याबाबतची कायदेशिर तक्रार सुद्धा दिली आहे. परंतु आतापर्यंत बिजोरा येथिल प्रतिबंधित खर्रा विक्रेत्यावर कार्यवाई केली नाही त्यामुळेबिजोरा येथिल प्रतिबंधित खर्रा विक्रीला पाठबळ कुणाचे ? हा सवाल आता उपस्थित होऊ लागला आह**

महागाव यवतमाळ बंदी असूनही महागांव तालुक्यातील मुडाणा बिटमधिल बिजोरा येथे खर्रा यासारखे नशा येणारे पदार्थ सर्रास मिळत आहेत. बिजोरा येथे एक हॉटेल व्यवसाईक खुलेआम प्रतिबंधित असलेल्या खर्राची निर्मितीकरुन सर्रासपणे विक्री केली जात आहे. या बेकायदेशिर व्यवसाईकांकडून बिजोरा गांवाजवळील असेलेले पानटपरी, छोटे चहाचे स्टॉल्स व जनरल स्टोअर्स यांच्यासोबत खेड्यांमधिल छोट्या छोट्या किराणा दुकानातही प्रतिबंधित खर्रा उपलब्ध करुन दिला जातो. यामुळे जिल्हामध्ये बंदी कागदावरच असल्यामुळे बेकायदा खर्रा विक्री जोमात सुरू आहे. मुडाणा येथिल बिट जमादार आणि अन्न व औषध प्रशासन विभाग याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत आहेत. कुठल्याही प्रकारची कारवाई होत नसल्यामुळे बिजोरा येथे खर्रा विक्री जोरात सुरू आहे. बिजोरा येथिल ठराविक व्यक्ती नियमीतपणे व राजरोसपणे प्रतिबंधित खर्राची वाहतूक करीत आहे. मुडाणा बिट जमादारांकडून त्याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जात आहे. बिजोरा येथे प्रतिबंधित खर्रा बनवल्यानंतर ठराविक दुकानदारांकडे पाठविला जातो. तेथून संबंधित खरेदीदार खर्रा घेऊन जातात. खर्राच्या एका पुडीची किंमत २० रुपये आहे. प्रतिबंधित खर्रावर बंदी असल्यामुळे कोणीही दराचा विचार करीत नाही. मिळेल त्या किमतीने खर्रा खरेदी केला जात आहे. मुडाणा बिटमधिल अनेकांनी प्रतिबंधित खर्राचा साठा करून ठेवला आहे. अनधिकृत टपऱ्या, छोटे स्टॉल्स आणि पत्र्याचे तात्पुरते उभारलेले शेड यांमधूनही खर्रा विक्री जोरात केली जाते. एक पानटपरीधारक महिन्याला लाखो रुपयांची उलाढाल करतो. मुडाणा बिटमधिल अनधिकृत टपरीवर प्रशासनाकडुन कुठलीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे अवैध धंदेही सुरू होण्यास प्रोत्साहन मिळत आहे. पोलिसांकडूनही तात्पुरती जुजबी कारवाई अन्न व औषध प्रशासन विभाग मूडाणा बिटमध्ये फिरकतच नाही आणि पोलिसांकडूनही तात्पुरती जुजबी कारवाई केली जाते आणि अवैद्य विनापरवानगी टपरीवर प्रशासन कारवाईच करीत नाही. यामुळे हा अनधिकृत व्यवसाय सर्रास सुरु आहे. .....

# शब्दगंध ची नगरमध्ये बुधवारीवार्षिक सर्वसाधारण सभा







/ श्रीरामपूर अहिल्यानगर - शब्दगंध साहित्यिक परिषद, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि.२५/१२/२०२४ रोजी स.११.00 वा.कोहिनूर मंगल कार्यालय,पाईपलाईन रोड,सावेडी,अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती माहिती संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी दिली. सभेत जमा खर्चास मंजुरी, शाखा विस्तार,नवीन सभासदांना मान्यता,सोळावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे आयोजन, साहित्य पुरस्कार, राज्य कार्यकारी मंडळ सदस्य निवड या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात येणार आहेत. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार उपस्थित राहणार आहेत.यावेळी राज्यस्तरीय प्रेम काव्य लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तरी सर्व साहित्यिक व साहित्य रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक, सचिव सुनील गोसावी, प्रा. डॉ. अशोक कानडे, सुभाष सोनवणे,भगवान राऊत, भारत गाडेकर, राजेंद्र पवार, डॉ.तुकाराम गोंदकर, सुनील धस, राजेंद्र फंड,स्वाती ठुबे, अजयकुमार पवार, राजेंद्र चोभे यांनी केले आहे.

**साईसंध्या** हे (बुलढाणा आवृत्ती) मराठी सांयदैनिक वृत्तपत्र,मालक शौकत अब्दुलकादर शेख यांचे करीता, प्रकाशक उद्धव श्रीराम फंगाळ यांनी, मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर यांच्या शुभम प्रिंटिंग प्रेस,पोस्ट ऑफिस जवळ, मेनरोड मेहकर जि.बुलढाणा - ४४३३०१ ( महा.), येथे मुद्रित करुन, डोणगांव रोड, शिक्षक कॉलनी, वॉर्ड क्र.४, मेहकर जि.बुलढाणा - ४४३३०१ ( महा.) येथे प्रकाशित केले. संपादक: उद्धव श्रीराम फंगाळ सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख - बातम्यांच्या मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही, (मुद्रणिय दोष संभवनीय), न्यायालयीन वाद - विवाद मेहकर न्याय कक्षेअंतर्गत

सायंदैनिक साईसंध्या विदर्भ देशा

# साहित्यरत्न पुरस्काराने कवी मनोहर पवार सन्मानित







बुलढाणा केळवद योथंल लेखक कवी शाहीर मनोहर पवार यांना १३ व्या मराठी ग्रामिण साहित्य संमेलनात रुई ता. इचलकरंजी जि कोल्हापूर येथे साहित्य रत्न पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले .कवी सरकार स्वाभिमानी वाचन मंदीर इंगळी ता . हात कनंगले जि. कोल्हापूर यांच्या वतीने हनुमान मंदीर सभागृह रुई जि. कोल्हापूर येथे १३ वे ग्रामिण साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते . त्यामध्ये विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले . त्यामध्ये कवी मनोहर पवार केळवद जि बुलढाणा यांना उपस्थित राज्य पाठ्यपुस्तक बालभारती पुणे राज्यपाल नियुक्त सदस्य डॉ. देविदास तारु साहित्यिक कवी लेखक पुरस्कार प्राप्त यांचे हस्ते तसेच जेष्ठ साहित्यिक किसन कुराडे आयोजक कवी सरकार इंगळी रामनाथ डेंगळे पत्रकार तसेच महादेव कुशापा कवियत्री डॉ. मंजुराजे जाधव ', अशोक मोहिते, कवी मधुकर हुजरे, विनायक पाटील, सोन कुसळे नागपूर मनिषा तराळे आदी मान्यवर कवी हजर होते . कवी मनोहर पवार यांना स्वाभिमानी साहित्य प्रेरणा, शाहीर अण्णाभाऊ साठे काव्य रत्न, तसेच शाहीरी कला गौरव, जीवन गौरव, उत्कृष्ठ समाजसेवक, जिल्हा भूषण कला गौरव, असे अनेक विविध प्रकारचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत वाचन लेखन आणि साहित्य कला सेवा वारसा जपणारे मनोहर पवार हे ग्रामिण भागातून नेतृत्व करीत आहेत . चित्रपट अभिनय लेखन, आणि पर्यटन तसेच शेती बरोबरोर साहित्य सेवा सातत्याने ते करीत असून विविध संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष, सदस्य आहेत . त्यांच्या कार्याचे मित्रपरिवार कडून शुभेच्छा आणि अभिनंदनांचा वर्षाव होत आहे .

# कर्मचारी अधिकारी यांचा अनुशेष भरून बिंदू नामावली सह प्रवर्गातील आरक्षण भरा

## रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे यांची मागणी




सिंदखेड राजा/ राज्यातील कामगार कर्मचारी व अधिकारी यांचा अनुशेष त्वरित भरून काढावा व बिंदू नामावलीनुसार निर्देशित केलेल्या त्या त्या प्रवर्गातील धोरण विहित केलेल्या आरक्षण टक्केवारीचा अवलंब करण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन चे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे मुंबई यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्धारे मागणी केली आहे . कामगार कर्मचारी अधिकारी यांचे जे सर्वांगीण प्रश्न प्रलंबित आहेत त्या प्रश्नांची नक्कीच कालबद्ध सोडवणूक कराल अशी आग्रहाची विनंती राज्यामध्ये सरळ सेवा भरती विविध खात्यामध्ये बरेच कालावधीपासून झाले नसल्यामुळे अनुशेष वाढतच आहे त्यामुळे त्या कर्मचारी वर्गावर कामाचा भार वाढत असून वेळेवर जनतेची कामे पूर्ण होत नाहीत गतिमान प्रशासन व सकारात्मक पवित्रता देणारी कार्यशैली त वाढ करण्यासाठी प्रत्येक विभागात पुरेसा कर्मचारी वर्ग आवश्यक आहे त्यामुळे शासनाने घेतलेले निर्णय कार्यान्वित होण्यासाठी नक्कीच मदत होईल अनुशेष भरताना शासनाच्या प्रत्येकी भागाने बिंदू नामावली अद्यावत करणे आवश्यक आहे तरच त्या विभागात कोणत्या प्रवर्गाचा किती अनुशेष आहे हे बिंदू नामावली रजिस्टर करून स्पष्ट होईल कारण बिंदू नामावली पद्धतीने विहित केलेल्या आरक्षण टक्केवारी प्रवर्गनिहाय स्पष्ट होते व तेव्हाच लवकर भरतीची वर्तमानपत्रात प्रसिद्धी देताना प्रवर्ग विषय आकडेवारी देणे सुरू होते तरी कृपया बिंदू नामावली अद्यावत करण्याच्या सूचना प्रत्येक विभागात देण्यात यावात अशी विनंती आहे पदोन्नती मधील आरक्षण हे न्यायालयाच्या निर्देशांचा चुकीचा अर्थ काढून २०१७ पासून मागासवर्गीयांचे त्यांचे हक्काचे पदोन्नतीतील आरक्षण बंद केले आहे त्यांचे पूर्ण अवलोकन करून पूर्ववत चालू करण्यात यावे शासनाच्या या एकत्रित निर्णयामुळे हजारो मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यामुळे त्यांच्यात असंतोष आहे की ते कर्मचारी या २०१८ ते २०२४ पर्यंतच्या काळात विना पदोन्नती सेवा नियुक्त झाले आहेत पदोन्नती देताना सेवा जेष्ठता लक्षात घेऊनच क्रमवारी दाखवून पदोन्नती देण्यात संयुक्तिक व न्याय आहे . शासकीय निधीची वाटप मागासवर्गीयांच्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन शासनाने जुनी जी निर्धारित केलेला आहे त्याचे वाटप करून तो त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वापरावा अन्य इतर खात्याकडे होऊ नये कारण जनमानसात याविषयी असंतोष आहे तसेच मागासवर्गीयांना आवश्यक सुविधा पासून वंचित राहावे लागते बार्टीच्या माध्यमातून ज्या सोयी सुविधा मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी राबविला जात होत्या त्यामध्ये घट होताना दिसत आहे त्या सर्व सोयी सुविधा पूर्ववत चालू कराव्यात अशी कळकळीची विनंती आहे प्रत्येक विभागात आवश्यकतेनुसार समुपदेशक यांची नेमणूक खास करून शिक्षण विभागामार्फत शाळा महाविद्यालय मध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांना समुपदेशित करणे आवश्यक आहे जुनी पेन्शन योजना लागू करावी व सेवानिवृत्ती वय ६० करावे आरक्षण बाह्य धोरण अवलंबून उच्चपदी अधिकाऱ्यांची सरळ सेवा भरती करून



मागासवर्गीय डावलले आहे परिणामी त्यांचे प्रतिनिधित्व उच्च पदी नाही कृपया सर्व बाबींचा गांभीर्यपूर्वक विचार करून सकृतदर्शनी कारवाई करण्याचे आदेश द्यावेत. ही विनंती १९९७ मध्ये घटनादुरुस्ती वरून पदोन्नतीमध्ये आरक्षण दिले होते केंद्र सरकारच्या डीओपीटी विभागाने २०२१ रोजी पत्र काढून राज्य शासन पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊ शकते असे सुद्धा राज्यांना आदेश दिले होते असे असताना महाराष्ट्र शासनाने २०१७ पासून पदोन्नती आरक्षण बंद केले आहे ते चालू करून पूर्ण करावे अशी मागणी रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशन चे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देवून मागणी केली आहे

सायंदैनिक साईसंध्या वृत्तासार

# तालुका अध्यक्ष पदी लक्ष्मणराव जायभाये यांची निवड






लोणार तालुक्यातील पळसखेड येथील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मणराव विक्रम जायभाये यांची राष्ट्रीय जयंती उत्सव समिती (वंजारी समाज ) महारास्ट्राच्या मान्यता प्राप्त संघटनेच्या लोणार तालुका अध्यक्ष पदावर महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ.एकनाथराव ढाकणे यांनी नुकतीच एका पत्राद्वारे निवड केली. लक्ष्मणराव जायभाये यांनी मागील पंचवीस वर्षांपासून केलेल्या सामाजिक शैक्षणिक सामाजिक आध्यत्मिक कार्याची दखल घेत त्याची तालुका अध्यक्ष पदी निवड केल्याचे नमूद आहे. आपण यापुढे राष्ट्रसंत भगवानबाबा श्री संत वामनभाऊ संत आवजींनाथ बाबा लोकनेते स्व. गोपीनाथ मुंढे साहेब यांचे विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहचवत समाज प्रबोधन आणि उत्कर्ष या बाबी वर कार्यरत राहावे अशी अपेक्षा या पत्रातून व्यक्त करण्यात आली आहे. वरील निवड ही पुढील तीन वर्षाकरिता करण्यात आली आहे. लक्ष्मणराव जायभाये यांनी तालुक्यातील युवा वर्गासाठी विविध योजनेचा लाभ समाजातील गरजू ना मदत तसेच विकास प्रवाहात सर्वांना समावून घेण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे सांगितले. लक्ष्मणराव जायभाये यांच्या निवडी बद्दल खटकेशवर महाराज संस्थान चे विश्वस्थ जगन्नाथभाऊ जायभाये लोणार तालुका पत्रकार संघांचे मार्गदर्शक डॉ. अनिल मापारी अध्यक्ष प्रमोद वराडे सचिव सचिन गौलेछया भाजपा चे जेष्ठ नेते ऍड. शिवाजी सानप कृषी बाजार समिती माजी संचालक दशरथ जायभाये हिरडव ग्रामपंचायत चे माजी सरपंच विजय डोईफोडे शिवसेना चे संतोष आघाव ऍड सदाशिव मुंढे व देऊळगाव कुंडपाळ चे सरपंच शेषराव डोंगरे उपसरपंच विष्णू जायभाये आणि सदस्य सतिष राठोड रामभाऊ जायभाये विष्णू सरकटे अमोल सरकटे पळसखेड येथील पोलीस पाटील सदाशिव जायभाये तसेच पृथ्वीराज आघाव प्रभाकर आंधळे प्रकाश सानप पंढरीनाथ आघाव खरेदी विक्री संस्था लोणार चे अध्यक्ष हिंमतराव बापू सानप विजय सानप ग्रामसेवक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अशोक बुरकूल देऊळगाव वायसा चे माजी सरपंच बद्री सोनुने प्रकाश मुंढे विजय जायभाये कैलास जायभाये शंकरराव थोरवे रमेश कांगणे सुनील सानप संदीप जायभाये अविनाश नागरे कर्मचारी संघटना महाराष्ट्र चे कार्याध्यक्ष प्रशांत जामोद्दे जिल्हा सरचिटणीस देवेंद्र बरडे परशराम जायभाये सह अनेक समाज बांधव आणि विविध राजकीय पक्षातील अनेक पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील कार्यकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

# अखिल भारतीय मातोश्री जिजाऊ परिवर्तन मराठी साहित्य परिषद संमेलनाचे आयोजन




शहापूर दि.११ जानेवारी २०२५ रोजी रविवारला एक दिवसीय दुसरे अखिल भारतीय मातोश्री जिजाऊ परिवर्तन मराठी साहित्य परिषद संमेलन शिवप्रसाद सदानंद जायस्वाल कॉलेज,अर्जुनी/मोरगाव(रेल्वे स्टेशनजवळ) जि-गोंदिया येथे सकाळी ठिक ११ वाजता आयोजित करण्यात आलेले असून साहित्य संमेलनाध्यक्ष म्हणून पद्मश्री डॉ.परशुराम खुणे यांची एकमताने निवड करण्यात आलेली आहे.तर संमेलनाचे उद्घाटक म्हणून आमदार श्री. राजकुमारजी बडोले साहेब यांच्या हस्ते तर स्वागताध्यक्ष डॉ.अनंता सूर हे उपस्थित राहतील.याशिवाय प्रमुख पाहुणे म्हणून जायस्वाल कॉलेजचे प्राचार्य डॉ ईश्वर मोहूरले सर .लुलकरणजी चितलंगे, मुकेशकुमार जयस्वाल,श्री बद्रीप्रसाद जायस्वाल, सौ.छाया नागपुरे आमगाव (सामाजिक कार्यकर्त्या),सौ.शारदाताई बडोले सामजिक कार्यकर्त्या तथा (कवयित्री) हे आपली हजेरी लावतील.याशिवाय विशेष अतिथी या नात्याने डॉ.श्याम मोहरकर माजी प्राचार्य सुप्रसिद्ध साहित्यिक समीक्षक, लेखक कलावंत झाडीपट्टी रंगभूमी,डॉ.राज मुसणे सुप्रसिद्ध साहित्यिक, लेखक व कलावंत झाडीपट्टी रंगभूमी तथा सहा.महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय आष्टी जिल्हा गडचिरोली हे आपले विचार व्यक्त करतील.यावेळी कविसंमेलनाचेही आयोजन करण्यात आले असून कवी संमेलनाध्यक्ष म्हणून




डॉ.धनराज खानोलकर सुप्रसिद्ध कवी, साहित्यिक तथा प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख नेवजाबाई हितकारणी महाविद्यालय ब्रम्हपूरी,जिल्हा चंद्रपूर हे असून संमेलनात प्रमुख पाहुण्या सौ. अंजनाबाई खुणे(झाडीपट्टीच्या बहिणाबाई), तर प्रा. डॉ.इंद्रकला बोपचे(कवयित्री) पितमलाल जी.के. कला व विज्ञान महिला महाविद्यालय कावराबंध सालेकसा या उपस्थिती दर्शविणार आहेत.यावेळी मान्यवरांच्या हस्ते छाया बोरकर(शापित शृंखला) काव्यसंग्रह,(भारताची रणरागिणी) कादंबरी,उमा गजभिये (गर्भ रेशमी) काव्यसंग्रहाचे प्रकाशन करतील.या सर्व कार्यक्रमाच्या संचालनाची जबाबदारी प्रा.लक्ष्मीकांत कापगते सर आणि श्री प्रा.शरद मेश्राम सांभाळणार ( शिवप्रसाद सदानंद जायस्वाल कॉलेज)अर्जुनी/ मोरगाव जिल्हा/ गोंदिया तसेच परिसरातील सर्व साहित्यप्रेमी आणि रसिकांनी कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन साहित्य संमेलनाच्या आयोजक संस्थापक छाया बोरकर यांनी केले.

सायंदैनिक **साईसंध्या** साहित्यानंद

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील ट्रेनिंग शिक्षक सह सर्व प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी रुजू करावे




बीड ( ) महाराष्ट्र राज्य महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवून ट्रेनिं शिक्षक पंचायत समिती कार्यालय जिल्हा परिषद कार्यालय आरोग्य विभाग असे अनेक जागेवर शासकीय व संस्थेच्या जागेवर सहा महिने करिता त्यांना काम करण्याची संधी दिली येत्या दोन महिन्यात त्यांचा कालावधी संपणार आहे काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थी युवक युवतीचा कालावधी वाढ होऊन त्यांना कायमस्वरूपी करावे त्या जागेवर रुजू करावे अशी मागणी सर्व ट्रेनी शिक्षकांच्या वतीने अलीम सय्यद नितीन आगम सोपान संत गणेश काशीद महेश काकडे विकास मगर राठोड सर यांनी केले आहे या संदर्भात नागपूर येथे आमदार अंबादास दानवे आमदार नितीन राऊत आमदार रोहित पवार आमदार कैलास पाटील आमदार राजू नवघरे आमदार मोनिकाताई रांजळे आमदार मुक्ती इस्माईल आमदार प्रवीण स्वामी सह अनेक आमदारांना निवेदनात नमूद केले आहे की सर्व प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून द्यावा अशी मागणी निवेदनातून करण्यात आली त्या अनुषंगाने निवेद नियमानुसार काम आणि किमान पाच तारखेच्या विद्यावेतन द्यावे युवा प्रशिक्षण योजने प्रशिक्षकांना किमान मा वेतन २५ हजार रुपये कायम करूनही दप्तर मुळेच विद्या वेतन मिळत तेव्हा दिरंगाई करणा योग्य कारवाई करावी प्र पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षकांना आहे त्या कायमस्वरूपी रुजू करावे मागणी नितीन अगम सय्यद सोपान संत काशीद विकास मगर राठ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली आहे







# विद्यार्थी ग्राहक प्रबोधन कार्यक्रम उत्साहात साजरा




पैठण /राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक पंधरवाडा अंतर्गत जिल्हा परिषद शाळा (मुलांची) येथे विद्यार्थी ग्राहक प्रबोधनकार्यक्रम घेण्यात आला. शनिवार दि.२१ रोजी अखिल भारतीय ग्राहक पंचायत पैठण व जिल्हा परिषद शाळेच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या प्रबोधन कार्यक्रमात प्रथम स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी स्वातंत्रसैनिक बिंदुमाधव जोशी यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने सूरु असलेल्या ५० वर्षाच्या ग्राहक हितासाठीच्या लढ्याची माहिती तालुकाध्यक्ष रामचंद्र आहुजा, संघटक विष्णू ढवळे यांनी दिली तर कुणाल पिंपळे, संतोष गोबरे यांनी ग्राहक हिताची माहिती दिली. सायबर सुरक्षेबाबत आणि मोबाईलवरील फसवणूकीबाबत विद्यार्थ्यांनी कशी काळजी घ्यावी, याबाबत जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य नानक वेदी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक अंकुश गाढे यांनी भावी पिढीला दक्ष ग्राहक बनण्याचे आवाहन केले. यावेळी जगन्नाथ जमादार, विष्णु सोनार, शिवाजी तुपे, धम्मरत्न अंधोरीकर, ताराचंद हिवराळे, उस्मान बागवान, फैय्याज शेख, वैशाली कूटे, वानोळे मैडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिलीप तांगडे तर आभार राजेश पाखरे यांनी मानले.



सायंदैनिक **साईसंध्या** अध्यात्म सागर

# महाराष्ट्र भूषण राष्ट्रपती पुरस्कार विजेते डॉ. खंडू माळवे यांचा आ.रामदास फुटाणे यांच्या हस्ते सन्मान




श्रीरामपूर मुंबई येथील मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक जनरल एम्लाईज युनियनच्या वतीने २८ व्या पोर्ट ट्रस्ट कामगार विशेष अंकाचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले, बॅलार्ड पिअर येथील पोर्ट ट्रस्टच्या विजयदिप कॉन्फरस हॉलमधे ज्येष्ठ कामगार नेते अॅड. एस.के. शेट्टे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे चित्रपट निर्माते दिग्दर्शक आणि व्यंगकवी आमदार रामदास फुटाणे आणि मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे सचिव पी.एन. बाहेकर यांच्याहस्ते दिप प्रज्वलन करून प्रकाशन सोहळ्याची सुरुवात झाली.याप्रसंगी रामदास फुटाणे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले की, मुंबई एअरपोर्ट जसे अदाणीच्या ताब्यात गेले तसेच वाढवण बंदर देखील भविष्यात अदाणीच्या ताब्यात जाईल, सत्ताधाऱ्यांनी जातीपातीचे राजकारण करून समाज व्यवस्था खिळखिळी केली आहे जातीच्या नावाखाली आंदोलने केली जातात समाज घडविण्याऐवजी समाजमोडण्याचे काम चालू आहे राजकारणात आपणाला खुप जागरूक राहिले पाहिजे राजकारणात तळमळीपेक्षा मळीचाच जास्त वास येतो आज संक्रिय राजकारणी दुस-या बाजुला आहेत.समाज जस जीवन जगतो तस आम्ही लेखन करतो.समाजाच्या सुखदु:खाशी आपण समरस असले पाहिजे कोरोनाने आपणास खुप काही शिकविले.त्यापासून आपण धडा घेतला पाहिजे आपणास सध्याचे अर्थकारण बदलेलं पाहिजे चांगभलं या कवितेतून सर्वांच भलं होवो असा संदेश दिला आहे.पोर्ट ट्रस्ट कामगार दिवाळी अंकात महाराष्ट्र भुषण डॉ. खंडू माळवे (राष्ट्रपती पुरस्कार विजेते) यांची कविता ''शब्द शब्द जपून ठेव'' जरूर वाचावी दिवाळी अंकात पन्नास टक्के लोक लिहितात. दिवाळी अंक वाचल्याने आपली वैचारिक पातळी वाढते ज्येष्ठ कामगार नेते अॅड.एस.के.शेट्टे अध्यक्षीय भाषणात



सांगितले की, निष्ठावंत कार्यकर्ते ही युनियनची खरी शक्ती आहे.रामदास फुटाणे यांच्या स्मरणशक्तीला मी सलाम करतो त्यांचे मार्गदर्शन हे हास्य फुलविणारे आहे प्रास्ताविक कार्यकारी संपादक मारूती विश्वासराव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय युनियनचे सेक्रेटरी व माजी बोर्ड मेंबर दत्ता खोसे यांनी केले सभेचे सुत्रसंचालन सतिश घाडी यांनी केले आभार सेक्रेटरी विजय रणदिवे यांनी मानले. स्थानिय लोकाधिकार समितीचे अध्यक्ष मिलिंद घनघुटकर गणित तज्ञ व राष्ट्रपती पुरस्कार विजेते नारायणन गव्हाणे नुसीचे मकरंद खान आदी मान्यवर उपस्थित होते, संगीता कदम, शिला भगत,योगीनी दुरापे यांनी स्वागत गीत म्हटले, या प्रसंगी मान्यवर व लेखकांना पोर्ट ट्रस्ट कामगार अंक देवून सन्मान करण्यात आला.प्रकाशन सोहळ्याला युनियनचे आजी ,माजी , पदाधिकारी, कार्यकर्ते,पोर्ट ट्रस्टचे कामगार, सेवानिवृत्त कामगार,खाजगी कामगार, लेखक व कवी मोठ्या संख्येने उपस्थित होते,सर्व साक्षी आमदार रामदास फुटाणे यांचे हस्ते महाराष्ट्र भुषण राष्ट्रपती पुरस्कार विजेते डॉ. खंडू माळवे यांचा सत्कार करण्यात आला. - वृत्त विशेष सहयोग,ज्येष्ठ पत्रकार बी.आर.चेडे - शिरसगाव

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वाटखेड येथील शिक्षकांनी दिली विद्यार्थ्यांना हिवाळ्यात उब




राळेगाव : सध्या हिवाळ्याचे दिवस सुरू आहे हिवाळ्यात खूप थंडी असते सध्या तर गुलाबी थंडी आहे अशा या थंडीत बरीच मुले स्वेटर न घालता शाळेत येतात व थंडीमुळे कुड कुडतात ही बाब हेरून शाळेचे मुख्याध्यापक किरण देशमुख व शाळेतील शिक्षिका कुमारी स्वर्णमाला जोल्हे, कुमुद डाखोळे व सौ.सविता मालखेडे यांनी विद्यार्थ्यांना स्वेटर घेण्यासाठी चर्चा केली शाळेतील स्वर्णमाला जोल्हे मॅडम यांच्या पुढाकाराने मागील वर्षी पासून विद्यार्थी बचत बँक हा उपक्रम सुरू आहे या बचत बँकेत विद्यार्थ्यांचे मागील वर्षी घेतलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे बक्षीसांची रक्कम जमा होती या रकमेतून शाळेतील विद्यार्थ्यांना स्वेटर घेण्याचा निर्णय शाळेतील सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज भाऊ रडके व सर्व सदस्य यांनी घेतला शाळेतील विद्यार्थ्याकरिता नेव्ही ब्ल्यू कलरचे स्वेटर आणण्याचा निर्णय घेण्यात आला. नेव्ही ब्ल्यू कलर चे स्वेटर आणून विद्यार्थ्यांना देण्यात आले आता सर्व विद्यार्थी दर शनिवारी सकाळी स्वेटर घालून शाळेत येतात त्यामुळे सर्व विद्यार्थी एकाच गणवेशात दिसतात आणि सोबतच थंडीपासून बचाव सुद्धा झाला विद्यार्थ्यांना मिळालेल्या बक्षिसांच्या पैशांचा योग्य वापर केल्यामुळे पालकांनी आनंद व्यक्त केला. व शाळेतील सर्व शिक्षकांचे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांचे कौतुक सुद्धा केले



सायंदैनिक साईसंध्या वार्ताविश्व

# नामवंत इंग्रजी शाळेत चक्क मुख्याध्यापकानेच विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याचं समोर




मुंबई बदलापूरमधील चिमुरड्यांवरील अत्याचाराची केस असो की पुण्यातल्या शाळेत डान्स टीचरने विद्यार्थ्याशी केलेलं गैरवर्तन, राज्यातील लैंगिक अत्याचाराच्या नवनव्या घटना रोज उघडकीस येत आहेत. या बातम्यांनी अक्षरश: नकोसं करून टाकलंय.घरी-दारी, बाहेर घेळतान अगदी शाळतेही आपली मुलं सुरक्षित आहेत की नाही याचीच चिंता पालकांना सतत सतावत असते. हे कमी की काय म्हणून आता मुंबईतील विक्रोळी येथेही असाच भयानक प्रकार घडल्याचं उघडकीस आलं आहे. विक्रोळीतील एका नामवंत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चक्क शाळेच्या मुख्याध्यापकानेच विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याचं समोर आलं न पोलिसांनी त्या नराधम आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित विद्यार्थिनी ही अल्पवयीन असून शाळेच्या मुख्याध्यपकानेच तिच्यावर अत्याचार केला आहे. ती विद्यार्थिनी गेल्या कित्येक दिवसांपासून शाळेत जाण्यास टाळाटाळ करत होती. तिचं हे वागण पाहून पालकांना संशय आला. त्यांनी तिला विश्वासात घेऊन, तिची विचारपूस केली असता तिने जे सांगितलं, ते ऐकल्यावर तिच्या पायाखालची जमीनच सरकली. मुख्याध्यापक वारंवार तिला त्यांच्या ऑफीसमध्ये बोलवायचे आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार करायचे असा आरोप आहे. मुलीवर काय प्रसंग ओढावाला हे लक्षात येताच तिचे पालक हादरले, पण



भीतीने घरात शांत न बसता त्यांनी या अत्याचाराला वाचा फोडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्या मुलीच्या पालकांनी पोलिसात धाव घेत तक्रार नोंदवली. त्याआधारे पोलिसांनी पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करत त्या शाळेच्या नराधम मुख्याध्यापकाला बेड्या ठोकून अटक केली. पीडित विद्यार्थिनी ही दीर्घकाळ अनुपस्थित राहिल्यानंतर शुक्रवारी शाळेत गेली आणि त्यावेळी तिच्या गैरहजेरीबाबत चौकशी करण्याच्या बहाण्याने मुख्याध्यापकांनी तिला आपल्या कार्यालयात बोलावून घेतले आणि नंतर छळ केला, असे पोलिसांनी नमूद केले. याप्रकरणी आरोपीला अटक केली असून पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे

# गुंज येथिल क्रांतीसुर्य गॅस एजन्सी वर गुन्हा दाखल करण्याची शिफार




महागाव यवतमाळ कागदपत्राची पूर्तता करूनही सहा ते सात महीने ग्राहकाला लाभ दिला नाही पंतप्रधान उज्वला योजने करिता एजन्सी कर्मचाऱ्यांनी दोन हजार रुपयाची मागणी केली .महागाव तहसील कार्यालयाची निरीक्षक अधिकारी मोहन कोल्हे यांनी केलेल्या चौकशीत गंभीर बाबी समोर आल्या.गॅस एजन्सी वर गुन्हा दाखल करण्याची शिफारस करण्यात आली आहेगुंज येथील क्रांतीसुर्य गॅस एजन्सी विरुद्ध अहवाल तयार करून कारवाईसाठी तहसीलदार मार्फत वरिष्ठांकडे पाठविण्यात आला आहे .वंदना चव्हाण राहणार सवना यांनी क्रांतीसुर्य एजन्सी कागदपत्राची पूर्तता करून गॅस पुरवठा करण्याची मागणी केली होती संबंधित एजन्सी कडून अनेक दिवस त्यांना कनेक्शन देण्यात आले नाही .पंतप्रधान उज्वला गॅस योजनेसाठी दोन हजार रुपयाची मागणी करण्यात आली होती . १०७ परवाना धारक लाभार्थ्यांपैकी ७२लाभार्थ्यां कडून जास्तीचे पैसे आकारण्यात आल्याचे लाभार्थ्यांच्या बयानुसार समोर आले यामुळे निरीक्षक अधिकारी आगावची रक्कम ६१ हजार रुपये वसूल करून शासन जमा करण्याची तसेच लाभार्थ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी परवाना निलंबित करून गुन्हा दाखल करण्याची शिफारस केली आहे गॅस गोदामाची तपासणी केली असता गोदाम मध्ये अग्निशामक यंत्र आढळले नाही





सायंदैनिक साईसंध्या ताज्या घडामोडी

# सूज्ञ नागरिक घडवण्यासाठी वक्तृत्व कलेचा उपयोग करावा - प्रा.डॉ.सुभाष वाघमारे

## प्राचार्य एस.के.उर्फ बापूसाहेब उनउने २९ व्या वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर




सांगली / प्रतिनिधी:वर्तमानकाळात वक्तृत्व कलेचा दुरुपयोग केला जात आहे. धडधडीत खोटे बोलून मी बरोबर बोललो हे असे सांगितले जात आहे. अविश्वासू लोक केवळ बोलघेवडे बनून मतलब साधून घेत आहेत. वास्तविक वक्तृत्व कलेचा उपयोग देशाच्या कल्याणासाठी करायला हवा, बंधुता वाढवण्यासाठी करायला हवा, पण आज देशाचे नेतृत्व करणारी काही मतलबी माणसे देशात भेद निर्माण करतात, सतत इतिहासाकडे घेऊन जातात, धर्मांध बनवतात,देशातल्या लोकांना धर्मांध बनवण्यासाठी वाणीचा उपयोग करतात, यामुळे देशात आदर्श निर्माण होण्याऐवजी संभ्रम निर्माण करण्यात येत आहे. अशाने देशातली माणसे कशी वागतील ? स्वतः नीतिमान राहून देशकल्याण व देशाचे हित हाच धर्म म्हणणारी माणसे तयार होण्याऐवजी विकृती तयार केल्या जात आहेत. इतिहासातील भांडणे उकरून हिंसा करण्याला उत्तेजन देणारे राज्यकर्ते उपयोगी नसतात. त्यातून देशाचे फार मोठे नुकसान होत असते.लोकशाहीत वाणी आणि लेखणी यांचा उपयोग विकासासाठी करण्याची गरज आहे. समाजसुधारक व शिक्षणतज्ज्ञ विचारवंत, सर्वांच्या कल्याणाचा विचार करणारे संत यांनी आपल्या वक्तृत्वाचा उपयोग माणुसकी वाढवण्यासाठी केला.पण आज काही राजकारणी लोकशाहीला भीती दाखवून एक दहशत निर्माण करताना दिसतात. बाबासाहेब आंबेडकर यांनी बर्क या विचारवंताचे एक वाक्य सर्वांना ऐकवले होते.. सत्ता देणे सोपे असते,सुज्ञपणा देणे कठीण असते. म्हणून आज आपण सुज्ञ नागरिक घडवण्यासाठी वक्तृव कलेचा उपयोग करावा,असे विचार छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांनी व्यक्त केले. ते सांगली जिल्ह्याच्या तासगांव तालुक्यातील सावळज येथील महात्मा गांधी विद्यालयात प्राचार्य शंकरराव उर्फ बापूसाहेब उनउने वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अमोल उनउने हे उपस्थित होते,या स्पर्धेचे आयोजन स्मृती मंडळाचे संस्थापक कै. मारुती तारळेकर यांच्या प्राचार्य शं.कृ.उनउने स्मृती मंडळ व एस.के .उनउने इंग्लिश मिडीयम स्कूल सावळज यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. वक्तृत्वाचे महत्व सांगताना डॉ.वाघमारे पुढे म्हणाले की ' वक्तृत्व म्हणजे केवळ वाणीचा विलास नव्हे, वक्तृत्व हे आपल्या व्यक्तिमत्वासाठी आवश्यक गोष्ट आहे. कोणतेही कार्य चांगले होण्यासाठी लोकांशी सुसंवाद आवश्यक असतो. कार्पोरेट जगात विश्वास व संवाद यांची गरज आहे. आपल्या मनातले स्वप्न वाणीतून व्यक्त करण्यासाठी धैर्य हवे. नेतृत्व गुण विकासात भाषा आणि सर्व क्षेत्रातील ज्ञान माहिती या गोष्टी आवश्यक आहे. कर्मवीर यांची वाणी आणि कृती,चारित्र्य हे अनुकरणीय असेच आहे.. वक्तृव म्हणजे अलंकारिक वाक्यांचा फुलबाजा नाही. वक्तृव म्हणजे आपल्याच भावनेत रमणारे भुईचक्र नाही. वर्तमानकाळातला अंधार दूर करण्यासाठी वक्तृत्व असते. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सत्य शोधण्यासाठी, हित करण्यासाठी, लोकांचे कल्याण व भारतीय लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी जागरूक राहून आपले विचार प्रसारित केले पाहिजेत .त्यासाठी त्यांनी चौफेर वाचन करण्याची गरज व्यक्त केली. साधनाचे बालकुमार २०२४ हे अंक त्यांनी वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना भेट दिले. अध्यक्षीय भाषणात अमोल उनउने यांनी महात्मा गांधी विद्यालय सावळज येथे १० वीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ११ ,००० रुपये व प्राचार्य एस.के उनउने इंग्लिश मिडीयम स्कूल सावळज येथे १० वीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ११००० रुपये असे पारितोषिक ठेवत असल्याचे यावेळी जाहीर केले. आणि विद्यार्थ्यांनी वक्तृत्व कलेचा अधिक विकास करावा असे मत व्यक्त केले. स्पर्धेच्या प्रारंभी ए.पी.पाटील यांनी प्रास्ताविक केले. सदर मंडळाचे सचिव श्री.दिलीप उनउने यांनी वक्ते व अन्य मान्यवर यांचा परिचय करून दिला.या स्पर्धेत एकूण ६५ विद्यार्थी सहभागी झाले. बालगटात साक्षदा क्षीरसागर;



कन्या विद्यामंदिर शिरोळ ,किशोर गटात हर्षवर्धन कारंडे ,शांती निकेतन विद्यामंदिर सांगली ; कुमार गटात विश्वजा प्रकाश पाटील. ज्ञानदेव सावंत हायस्कूल, बस्तवडे व खुल्या गटात शिवम संजय माळकर ,भारती विद्यापीठ, सांगली. यांनी प्रथम क्रमांक मिळविले. या स्पर्धेत सर्व गटात द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. याच कार्यक्रमात महात्मा गांधी विद्यालयाच्या मयुरेश निकम १० वी, श्रेया पाटील १० वी यांना व प्राचार्य उनउने इंग्लिश मिडीयम स्कूल च्या स्वरा पाटील १० वी, अक्षद पाटील १० वी या विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कार देण्यात आले. यावेळी सर्व गतातील परीक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन अनिल बागवडे यांनी केले. आभार व्ही.बी.गाट यांनी मानले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप मारुती तारळेकर,माजी मुख्याध्यापक एस.ए पाटील, शिदगोंड पाटील,दिलीप चिवटे,सुनील केडगे,संजय थोरात,बाळासाहेब सावंत, रमेश कांबळे, डॉ.डी.आर. तारळेकर ,स्पर्धक पालक, शिक्षक ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.संकलनसमता मीडिया सर्व्हिसेसश्रीरामपूर – १५६११७४१११

# भाजपा नेते देवानंद सानप यांच्या चाहत्यांकडून गरजवंत महिलांना किराणा किट व साडी चोळी वाटप







**आमदार मनोज कायंदे, प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ, माजी आमदार तोताराम कायदे,भाजपा नेते प्रभाकर ताठे,सह अनेक पक्षातील नेत्यांनी व सामाजिक संघनटनेतील कार्यकर्त्यांनी सानप यांना शुभेच्छा दिल्या**

लोणार )पत्रकार,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांचा आज दि २२ डिसेंबर रोजी ठिक ठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला. सामाजिक संघटनेच्या व पत्रकार संघटनेच्या वतीने सिंदखेडराजा मतदार संघात दुसरबीड तढेगाव बीबी भुमराळा किनगाव जट्ट चिखला देऊळगाव कोळ झोटींगा खंडाळा लोणार मांडवा विरपांगरा सह इतर ठिकाणी त्यांच्या चाहत्यांनी व मित्र मंडळींनी त्याचा शाल श्रीफळ देवून हृद्य सत्कार करण्यात आला तद् नंतर बिबी येथील गरजवंत महिलांना वाढदिवसानिमित्त किराणा किट व साडी चोळी चे वाटप देवानंद सानप यांच्या चाहत्यांकडून वाटप करण्यात आले वयाच्या १५ वर्षापासून सामाजिक कार्यातून राजकारणात आले आणि राजकारणात आल्यानंतर सर्वसामान्यांय विषयी असलेली तळमळ या कार्यातून लोकप्रियता वाढत गेली आणि अंदोलनाच्या माध्यमातून जिल्हाभर कार्यकर्ते व मित्र परिवार वाढतच गेला यातून शेतकरी कष्टकरी मजूर अनाथ अपंगांच्या समस्या निवारण्याचे काम करून शासन दरबारी न्याय मिळवून दिला आजही ते कार्य चालू असून भविष्यात गोरगरिबांवरील अन्याय अत्याचाराच्या लढून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य चालूच ठेवणार असे देवानंद सानप यांनी सांगितलेयावेळी पत्रकार भगवान नागरे काशिनाथ राऊत,दिनकर काकड, अशोक मुंडे,मधुकर मोहीते, रमेश खंडागळे ,भागवत आटोळे, रामप्रसाद जाधव ,रोशन चव्हाण, ऋषी दंदाले , कृष्णा पंधे,जहीर भाई,भाजपा युवा ता अध्यक्ष राम डुकरे, ता.सचिव प्रविण धाईत, व्यापारी आघाडी जि. उपाध्यक्ष गोपाल काबरा, वंचित ता. अध्यक्ष दिलीप राठोड,धनंजय कायंदे,सागर मुर्तडकर ,रंजीत सानप , आशिष अग्रवाल ,भागवत मुळे, विशाल मुर्तडकर , ऋषिकेश धाईत, मंगेश बोबडे , बाबू सिंग जोरावर सरपंच गणेश काकड ,शाम इंदोरिया, सुनिल मुंढे, गजानन मुर्तडकर , अमोल गावडे , राहुल वानखेडे, कैलास तांदुळे, प्रसाद कुलकर्णी, रामेश्वर काळुसे, विलास दराडे, गणेश डुकरे, गजानन गायकवाड,असंख्य चाहते व मित्र मंडळी हजर होती.